अपर पोलीस आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग यांचे कार्यालय,
९१, सर पोचखानवाला रोड, वरळी, मुंबई - ४०००३०.
दुरध्वनी क्र. २४९२१२१२ (विस्ता),
Email- addlcpacbmumbai@mahapolice.gov.in

दिनांक :- २९.१२.२०२३

## -: प्रेसनोट :-

| | | |
|---|---|---|
| १ | ला.प्र.वि.कार्यालय | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग, मुंबई. |
| २ | गु.र.क्र | ४२/२०२३ |
| ३ | कलम | कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम -१९८८ |
| ४ | आलोसेचे नांव कार्यालयाचा पत्ता | श्री. देवेश राजकुमार पारधी, वय ३१ वर्षे, पद-कनिष्ठ अभियंता, इमारत व कारखाने विभाग, एन विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका, घाटकोपर (पूर्व),मुंबई |
| ५ | मागणी केलेली लाचेची रक्कम | रुपये १,५०,०००/- तडजोडीअंती रुपये १,००,०००/- |
| ६ | स्विकारलेली लाचेची रक्कम | रूपये १,००,०००/- |
| ७ | हस्तगत लाचेची रक्कम | रूपये १,००,०००/- |
| ८ | थोडक्यात हकीगत | यातील फिर्यादी हे घाटकोपर पश्चिम येथील एका सुपर मार्टचे लायजनिंग व इतर संबंधीत कामे करतात. यातील लोकसेवक यांनी सदर सुपर मार्टचे निरीक्षण करण्याकरीता दिनांक २३/१२/२०२३ रोजी कलम ४८८ मुंबई म्युनिसिपल कार्पोरेशन अॅक्ट अन्वये नोटीस बजावली होती. त्यानुसार दिनांक २६/१२/२०२३ रोजी लोकसेवक यांनी सुपर मार्टचे निरीक्षण करुन कादपत्रांची मागणी केली. त्यानंतर फिर्यादी यांनी सुपर मार्टच्या वतीने लोकसेवक यांच्या कार्यालयात जावून कागदपत्रे सादर केली असता, लोकसेवक यांनी त्यामध्ये त्रुटी काढुन नमुद सुपर मार्टचे शेडसंबंधीत बिल्डींग प्लान उपलब्ध नसल्यामुळे सदरचे शेड अनधिकृत असुन ते काढुन टाकण्यास सांगितले. तसेच नमुद शेडचे निष्कासन करु नये याकरीता लोकसेवक यांनी फिर्यादी यांच्याकडे रु. १,५०,०००/- इतक्या लाचेची मागणी केली होती.<br><br>फिर्यादी यांना नमुद लोकसेवकास लाच देण्याची इच्छा नसल्याने, त्यांनी दिनांक २९/१२/२०२३ रोजी ला.प्र.वि. कार्यालयात समक्ष हजर राहुन लोकसेवकाविरुध्द लेखी तक्रार केली.<br><br>प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक २९/१२/२०२३ रोजीच्या पडताळणी कारवाईदरम्यान यातील लोकसेवक यांनी प्रथम रु. १,५०,०००/- लाचेची मागणी करुन तडजोडीअंती रु. १,००,०००/- लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले.<br><br>त्यानुसार केलेल्या सापळा कारवाईदरम्यान लोकसेवक यांनी पंचासमक्ष रु. १,००,०००/- लाचेची रक्कम स्विकारल्याने, लोकसेवकास रंगेहाथ पकडण्यात आले. म्हणून लोकसेवका विरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ चे कलम ७ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. |

**मार्गदर्शन अधिकारी :-** **श्री. विजय पाटील सो, अपर पोलीस आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभाग.**
**श्री. राजेंद्र सांगळे सो, अपर पोलीस उप आयुक्त,लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,बृहन्मुंबई विभाग.**
**श्री. भागवत सोनावणे सो, अपर पोलीस उप आयुक्त,लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,बृहन्मुंबई विभाग.**

सहाय्यक पोलीस आयुक्त लाचलुचपत प्रतिबंधक विभाग बृहन्मुंबई

(नितीन दळवी)
सहाय्यक पोलीस आयुक्त (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,मुंबई.

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारा संबधीत काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबधंक विभाग, मुंबई विभागाशी संपर्क साधावा.

संपर्क- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग ९१, सर पोचखानवाला रोड, वरळी, मुंबई ४०००३०

संकेतस्थळ - acbmaharastra.gov.in,

ईमेल- 1) acbwebmail@mahapolice.gov.in, 2) addlcpacbmumbai@mahapolice.gov.in.

ऑनलाईन तक्रार अर्ज-www.acbmaharastra.net. **टोल फ्रि. क्र.** १०६४

**दुरध्वनी क्र.** ०२२ २४९२१२१२ फॅक्स. क्र. ०२२२४९२२६१८, **व्हॉटसअप क्र.** ९९३०९९७७००